# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. १७४-२३** **दिनांक ०१/०६/२०२३**

## वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिला वेश्यादलालास ताब्यात घेवुन ०१ अल्पवयीन व ०२ पिडित मुलींची सुटका - अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष,भाईंदर पथकाची कामगिरी.

दिनांक ३१.०५.२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक कक्ष, भाईंदर पथकास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मिरारोड येथे राहणारी महिला वेश्यादलाल रागिनी वर्मा ही वेश्याव्यवसाय करीत असुन तीचा मोबाईल क्रमांकावर पुरुष गिऱ्हाईकाने संपर्क साधला असता ती व्हॉटसअॅपव्दारे पुरुष गिऱ्हाईकांना अल्पवयीन मुली व महिलांचे फोटो पाठवुन त्यांच्याशी संपर्क साधुन मिरा-भाईंदर परिसरातील लॉजमध्ये गिऱ्हाईकास रुम बुक करावयास लावुन किंवा गिऱ्हाईकाचे सोयीनुसार शॉर्ट टाईमसाठी वेश्यागमनाचा मोबदला घेवुन पुरुष गिऱ्हाईकास वेश्यागमनासाठी अल्पवयीन मुली व महिला पुरविते.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक कक्ष, भाईंदर पथकाचे पो.नि.श्री. समीर अहिरराव यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व पंच यांना महिला वेश्यादलाल हीने सुचविल्याप्रमाणे वर्धमान फॅन्टासीचे मेन गेटजवळील फुटपाथ, शिवार गार्डन, मिरारोड पुर्व येथे सत्यता पडताळुन पोलीस पथकासह छापा कारवाई केली असता महिला वेश्यादलाल रागिनी वर्मा हिने बोगस गिऱ्हाईकास मुलींचे फोटो पाठवुन ०१ अल्पवयीन व ०२ पिडित मुली असे एकुण ०३ मुलींना सोबत घेवुन बोगस गिऱ्हाईकास दाखवुन त्यांना वेश्यागमनासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाच्या मोबदल्यात रक्कम ठरवुन स्वतःच्या उपजिवीकेकरीता रक्कम स्वीकारल्याने तिस इतर मुद्देमालासह ताब्यात घेवुन ०१ अल्पवयीन व ०२ पिडित मुली असे एकुण ०३ मुलींची सुटका करण्यात आली. सदर बाबत स.फौ. पाटील यांनी सकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन महिला वेश्यादलाल रागिनी वर्मा हिचेविरुध्द मिरारोड पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I २११/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३६६(अ), ३७०(१), ३७० (३), ३७० (४), ३७२ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ सह बालकाचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १६,१७,१८ अन्वये दिनांक ०१.०६.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक कक्ष, भाईंदर पथकाचे पो.नि. श्री. समीर अहिरराव, स.फौ. विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पो.अंम. केशव शिंदे, चा.पो.हवा. सम्राट गावडे, महिला पो.अंम. अश्विनी भिलारे, महिला म.सु.ब.शुभांगी मोकल यांनी केली आहे.

-----ooo-----